
# निवडणूक कालावधीत समाजमाध्यमांचा वापर डोळसपणे करावा : जिल्हाधिकारी

निवडणूक प्रचारासाठी समाजमाध्यमांच्या वापरावर निवडणूक प्रशासनाचे लक्ष



**पुणे / प्रतिनिधी**

जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू असून निवडणूक प्रचारासाठी राजकीय पक्ष, उमेदवार तसेच त्रयस्थ व्यक्तींकडून समाजमाध्यमांचा वापर होत असताना निवडणूक विषयक नियमांचे काटेकोर पालन व्हावे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. समाजमाध्यमांद्वारे होणाऱ्या निवडणूक प्रचारावर निवडणुकीसाठी कार्यान्वित जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण कक्षाचे बारकाईने लक्ष असून नियमांचा भंग आढळून आल्यास कारवाई केली जाईल असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

डॉ. दिवसे म्हणाले, फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स, युट्युब आदी समाज माध्यमांचा निवडणूक प्रचारासाठी अवलंब केला जातो. असे करताना आचारसंहितेच्या काळात निवडणूक प्रक्रियेला बाधा येईल अशा प्रकारची कोणतीही पोस्ट नागरिकांनी समाज माध्यमांवरुन करु नये. आचारसंहितेच्या काळात फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स आदी समाज माध्यमांवरून आक्षेपार्ह पोस्ट, तथ्यहीन माहिती पसरवणे, निवडणूक प्रक्रियेत बाधा निर्माण करण्याच्या गैरप्रकारांवरही माध्यम संनियंत्रण कक्षाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

पूर्वप्रमाणीकरणाशिवाय जाहिराती प्रसारीत केल्यास कारवाई

उमेदवार, राजकीय पक्षांना तसेच त्रयस्थ व्यक्तींना प्रचाराच्या जाहिराती दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल वाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस तसेच सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळावरुन प्रसिद्ध करावयाच्या असल्यास या जाहिराती जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून प्रमाणीत करुन घेणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हा आणि राज्य स्तरावर जाहिरात प्रमाणीकरणासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रमाणीकरण करुन न घेता जाहिरात प्रसारीत किंवा पोस्ट केल्यास निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

समाजमाध्यमाद्वारे राजकीय मजकूर, संदेश, छायाचित्र किंवा व्हिडीओ पोस्ट करण्यास पूर्व प्रमाणिकरणाची आवश्यकता नाही. तथापि समाजमाध्यमांवर राजकीय जाहिराती पोस्ट केल्यास त्यासाठी पूर्वप्रमाणीकरण आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवसपूर्वीचा कालावधी वगळता वृत्तपत्रातील राजकीय जाहिरातींसाठी इतरवेळी प्रमाणीकरणाची आवश्यकता नाही. तथापि ती जाहिरात ई-वृत्तपत्रात प्रकाशित होणार असल्यास त्यास पूर्व प्रमाणीकरण आवश्यक राहणार आहे.

उमेदवारांच्या राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीशी (एमसीएमसी) जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससून सर्वोपचार रुग्णालयासमोर, पुणे ४११००१ दूरध्वनी क्र. ०२०-२६१२१३०७, ई-मेल वळेंपिशसारळश्र.लो या पत्त्यावर संपर्क साधावा, असे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात

### तडीपार गुंडाला शस्त्रासह अटक

**पिंपरी :** पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केलेल्या गुंडाला पिंपरी पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून एक कोयता जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई गुरुवारी (दि. ४) सायंकाळी साई चौकाजवळ पिंपरी येथे करण्यात आली. अमन अजीम शेख (वय २२, रा. आर्य समाज चौक, पिंपरी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार रोहित वाघमारे यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अमन शेख याला पिंपरी चिंचवड पोलिसांनी ५ जानेवारी २०२४ रोजी दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे. त्याचा तडीपारीचा कालावधी संपण्यापूर्वी तो शहराच्या हद्दीत आला. तसेच त्याने कोयता बाळगला. याबाबत माहिती मिळाल्यानंतर पिंपरी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून २०० रुपये किमतीचा कोयता जप्त करण्यात आला आहे. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.

## जुन्नर तालुक्यात १८ गावांची पिण्यासाठी टँकरची मागणी

**जुन्नर / प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात उन्हाळ्याची तीव्रता चालू वर्षी मोठ्या प्रमाणात दिसू लागलेली आहे . यामुळे पाणीटंचाईला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागणार आहे. जुन्नर तालुक्यात १८ गावातील ग्रामपंचायत ने तहसीलदार रवींद्र सबनीस व पंचायत समिती गटविकास अधिकारी सूर्यवंशी यांच्याकडे पिण्यासाठी टँकरची मागणी केलेली आहे टँकरची मागणी करणारे गावांची नावे पुढीलप्रमाणे -- मांडवे, गुळूंचवाडी, आणे, सीतेवाडी , गोद्रे, पेमदारा, शिंदेवाडी, निमगिरी अंजनावळे, हडसर,कोपरे, नळावणे, बांगरवाडी , सुकाळवेढे हातवीज, आंबे व सोनावळे अशी आहेत. या गावांपैकी १० प्रस्ताव मंजूर असून यातील ८ गावांना व वाड्यावस्त्यानां पिण्यासाठी टँकर सुरू आहेत. यापुढील दुष्काळ व दुर्गम भागात ग्रामपंचायतच्या माध्यमातून पाणी टँकर प्रस्ताव लवकरात लवकर पाठवा अशी सूचना तहसीलदार व पंचायत समिती कार्यालयातून सांगण्यात आले आहेत.

## मतदान जागृती उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग

**पुणे / प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीपमार्फत राबविण्यात येणाऱ्या मोहिमेमध्ये विद्यार्थी, युवा, महिलांच्या सहभागासोबतच वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातील ज्येष्ठ नागरिकही सहभागी झाले आहेत.

वडगाव शेरी मतदार संघातील स्वीप पथकाने टँक रोड, विश्रांतवाडी येथे ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मतदान प्रक्रिया समजावून देत मतदानाची शपथ दिली. ज्येष्ठ नाागरिकांना सुलभ मतदानासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती यावेळी देण्यात आली. लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ नागरिकांनी यावेळी केले.

स्वीप पथकाकडून मस्केवस्ती, आळंदी रोड, विश्रांतवाडी पोस्ट ऑफीस, धर्मवीर संभाजी को. अर्बन बँक विश्रांतवाडी, येरवडा येथील जिल्हा होमगार्ड प्रशासकीय कार्यालय, आरोग्य भवन, येथे मतदान जागृती करण्यात आली.

पर्वती विधानसभा मतदार संघांतर्गत स्वारगेट बस डेपो मेकॅनिकल स्टाफ यांना स्वीप पथकाकडून मतदान प्रक्रियेविषयी माहिती देऊन शपथ देण्यात आली. शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात लोकशाही अधिक



बळकट व्हावी यासाठी विविध स्पर्धा, विद्यार्थी रॅलीद्वारे जनजागृती करण्यात येत असून त्याअंतर्गत सौ. विमलाबाई गरवारे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वीर नेताजी पालकर येथील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धा व रॅलीद्वारे घोषणा देत नागरिकांना मतदानाचे आवाहन केले. स्वीप पथकाने विविध ठिकाणी क्युआर कोडचा वापर करून मतदार यादीतील नाव व मतदान केंद्र शोधण्याविषयी माहिती दिली.

वडगाव शेरी येथे आढावा बैठक

वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन बारवकर यांनी सर्व समन्वयक अधिकाऱ्यांच्या निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेतला. श्री. बारवकर यांनी कामात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. अधिकाऱ्यांनी सतर्क राहून आपापली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडण्याच्या सूचना यावेळी दिल्या. बैठकीला अतिरिक्त सहायक निवडणूक अधिकारी तृप्ती कोलते, गौरी शंकरदास उपस्थित होत्या.

## आचारसंहितेच्या उल्लंघन प्रकरणी दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**पिंपरी / प्रतिनिधी**

गल्लोगल्ली कमळ चिन्ह लावून निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेचे उल्लंघन करूनही संबंधितांवर कारवाई करण्यात अधिकारी,कर्मचारी कसूर करत आहेत.भाजपा पदाधिकाऱ्यांच्या चुकांना खतपाणी घालणाऱ्या दोषी अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांनी केली. तसेच कमळ चिन्ह लावणाऱ्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांवर देखील गुन्हे दाखल करावे, अशी मागणी काळे यांनी पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

सतीश काळे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे पालन करणे सर्वांना अनिवार्य आहे. मात्र त्याचे भान भाजपच्या पदाधिकाऱ्यांना नाही. पिंपरी चिंचवड शहरात भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आपल्या पक्षाचे चिन्ह आणि नावाचा खुलेआम वापर करताना दिसत आहेत. वास्तविक पाहता संबंधित निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी पक्षांचे चिन्ह, लोगो हटविण्याची कार्यवाही पार पाडणे आवश्यक आहे. मात्र निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आहेत की काय असा प्रश्न पिंपरी चिंचवड शहरातील सामान्य जनतेला पडत आहे.भाजपाचे चिन्ह असलेले कमळ शहराच्या गल्लोगल्ली उघडपणे दिसत आहे. सार्वजनिक भिंती, पोस्टरवर हे चिन्ह दिसत आहे. त्याच्यावर अद्याप कारवाई होताना दिसत नाही.

या बाबत कमळ चिन्हाचे फोटोसह निवेदन देऊन संभाजी ब्रिगेडच्या वतीने इशारा देण्यात आला होता. त्यांनतर काही काळ कारवाईचा दिखावा करण्यात आला. मात्र शहरातील संपूर्ण भाजपचे चिन्ह हटविण्याकडे अधिकारी कानाडोळा करत आहेत. पुन्हा शहरात भाजपाने राजरोसपणे आपल्या चिन्हाचा वापर सुरु केला आहे. निवडणूक आयोग देखील याची गांभीर्याने दखल घेत नाहीत. आचारसंहितेच्या नियमांना फाट्यावर मारणाऱ्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच या प्रकरणाकडे गंभीरपणे न बघणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर देखील कारवाई करावी, अशी मागणी काळे यांनी केली.

## निवृत्तीवेतन होणार थेट बँक खात्यात जमा

**पुणे :** जिल्हा कोषागार कार्यालय पुणे येथून मासिक निवृत्तीवेतन घेणाऱ्या राज्य शासकीय निवृतीवेतनधारक, कुटुंब निवृतीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन बँकेमार्फत जमा होत असते. तथापी, एप्रिल २०२४ पासूनचे निवृत्तीवेतन हे ई-कुबेर प्रणालीमार्फत भारतीय रिझर्व्ह बँकेतून थेट निवृत्तवेतनधारकांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याची माहिती वरिष्ठ कोषागार कार्यालय, पुणे यांनी दिली आहे. निवृत्तीवेतनधारकांनी पुणे कोषागार कार्यालयातील निवृत्तीवेतन विभागाला सूचीत न करता बँक शाखा किंवा खाते क्रमांक परस्पर बदलला असल्यास त्यांचे निवृत्तीवेतन जमा होणार नाही. अशा निवृत्ती वेतनधारकांनी मूळ बँकेचे ना हरकत प्रमाणपत्र आणि नवीन बँक खात्याच्या पासबुकच्या प्रतिसह जिल्हा कोषागार कार्यालयातील निवृत्तीवेतन विभागाला १९ एप्रिलपर्यंत माहिती द्यावी.

## मोई गावात ड्रग्स विक्रीसाठी आलेल्या दोघांना अटक



**पिंपरी / प्रतिनिधी**

**मोई गावात रस्त्याच्या कडेला एमडी (मेफेड्रोन) विक्रीसाठी आलेल्या दोघांना सापळा रचून पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली आहे.**

मोई गावात रस्त्याच्या कडेला एमडी (मेफेड्रोन) विक्रीसाठी आलेल्या दोघांना सापळा रचून पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली आहे.

इस्तियाक अब्बास चौधरी (वय २६ रा.काळेवाडी), अब्दुलकरीम अब्दुल्ला चौधरी (वय २६ रा. चिखली) या दोघांनापुअटक केली असून त्यांचा साथीदार सोमनाथ चौधरी (रा. कुदळवाडी) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.याप्रकरणी तिघांवर एमहाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी इस्तियाक व अब्दुलकरीम हे दोघे १६ ग्रॅम वजनाचे एमडी विक्रीसाठी मोई गावातील भैरवनाथनगर येथे विक्रीसाठी आले होते. यावेळी पोलिसांनी सापळा रचून अटक केले. त्यांच्याकडून पोलिसांनी एमडी व ३ मोबाईल असा एकूण ३ लाख रुपयांचा एवज जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी सोमनाथ याच्याकडून हे एमडी आणले होते. महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून अंमली पदार्थ विरोधी पथक याचा पुढील तपास करत आहेत.

## शिक्रापूरच्या कोयाळी शाळेच्या दोघांची नवोदयसाठी निवड

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

शिक्रापूर ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयाळी पुनर्वसन शाळेतील विद्यार्थी नेहमीच वेगवेगळ्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवीत शिष्यवृत्ती परीक्षेत उच्चांक गाठत असताना या शाळेतील सोहम योगेश बेंद्रे व सर्वेश दिनेश आळे या दोघा विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय साठी निवड झाली असल्याची माहिती मुख्याध्यापक संतोष विधाटे यांनी दिली आहे.



शिक्रापूर ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयाळी पुनर्वसन शाळेतील विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालयसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये सहभाग घेतला होता, नवोदय विद्यालय निवडीसाठी बुद्धिमत्ता, गणित, भाषा अशा तीन विषयांची १०० गुणांची परीक्षा घेऊन सदर परीक्षेनंतर सीबीएससीच्या अंतर्गत विद्यार्थी निवड केली जाते. सदर जवाहर नवोदय विद्यालयात दरवर्षी इयत्ता सहावी प्रवेशासाठी ४० टक्के मुली व ६० टक्के मुले अशी विद्यार्थ्यांची निवड केली जाते. तर निवड झाल्यानंतर इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत जवाहर नवोदय विद्यालयात केंद्र शासनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयाळी पुनर्वसन शाळेतील सोहम योगेश बेंद्रे व सर्वेश दिनेश आळे या दोघा विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी निवड झाली असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक संतोष विधाटे तसेच ज्योती विधाटे, स्वाती होले, सिमा ढोबळे, रूपाली कोरेकर, चारुशीला सानप या शिक्षकांनी मार्गदर्शन केले, तर सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक संतोष विधाटे, केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, शिक्षण विस्ताराधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर, सरपंच रमेश गडदे यांनी अभिनंदन केले असून या शाळेची नवोदय विद्यालय निवडीची परंपरा कायम ठेवल्यामुळे शाळा समिती आणि ग्रामस्थांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.


**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

### तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 01.04.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 1. दिनेश रमणिकलाल पटेल भूत 2. जल्पा दिनेश पटेल भूत | मालमत्तेचा पत्ताः रो हाउस/बंगलो नं.R1/15A, क्षेत्रफळ 232 चौरस मीटर्स, ''श्री स्वामी समर्थ कॉ-ऑपरेटीव हाउसिंग सोसायटी लिमिटेड'' मध्ये अंदाजे 2,500 चौरस फीट, जी जमीन धारणा सर्वे नं.148 हिस्सा नं.1A/1/2, सूस रोड पाषाण येथे बांधली आहे आणि पाषाण, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र 411045 येथे आहे<br>सीमा: पूर्व R1/14B; पश्चिम R1/15B; उत्तर सोसायटीचा अंतर्गत रस्ता; दक्षिण R1/16A | H0098408 01210531 30/H0098 40801210 53130L/H 00984080 12105313 0G | 11 ऑगस्ट, 2023 | रु. 14,17,500/- | रु. 2,92,50,556.60 | रु. 1,41,75,000 | 19-04-2024 | 25-04-2024 सकाळी 10 ते सायंकाळी 5:30 |

#### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/04/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **25/04/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **26/04/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 06.04.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com